MHBI110006562026

-

# फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ७८/२०२६
## निशाणी क्र.०१ खालील आदेश

१. अर्जदार यांनी सदरचा अर्ज पो.स्टे. गेवराई, ता. गेवराई जि. बीड यांनी गु.र.नं.५६/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०३ (१) या गुन्ह्यात मधील जप्त केलेले जॉन डिअर इंडिया प्रायवेट लिमीटेड (TRAC) कंपनीचे 5045D मॉडेलचे ट्रॅक्टर ज्याचा रजि. नं. MH-21-AN-2213 असा असुन चेसीस क्र. 1PY5045DCGA036206 व इंजिन क्र. PY3029D409494 असा आहे. सदर वाहन अर्जदाराने त्याचे ताब्यात मिळणेकरीता अर्ज केला आहे. अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की, सदर गुन्ह्याचा व त्याचा काहीएक संबंध नाही. अर्जदार हा प्रस्तुत वाहनाचा मालक आहे. सदरचे वाहन एकाच जागेवर बंद अवस्थेत उभे राहिल्यास सदर वाहनाचे इंजिन, टयुब, टायर मध्ये खराबी होवुन अर्जदाराचे अतोनात नुकसान होण्याची शक्यता आहे. करीता अर्जदाराने सदरचे वाहन पुर्ववत त्यांचे ताब्यात देण्यात यावे अशी विनंती केली आहे.

२. सरकारी वकीलांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले असुन त्यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये कथन केले आहे की, सदर मुददेमाल हा महत्वाचा पुरावा असून अर्जदारास परत केल्यास तो त्यामध्ये बदल, विक्री आणि इतरांना हस्तांतरण करु शकतो. अर्जदाराने वाहनाची मूळ कागदपत्रे दाखल केली नाहीत. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. प्रस्तुत अर्जास तपासी अधिकारी यांनी त्यांचे म्हणने सादर केले. त्यांनी प्रस्तुत अर्जास त्यांचा आक्षेप नोंदविला. तपासि अधिकारी कथन करतात की, सदर मुददेमाल अर्जदारास परत केल्यास तो पुन्हा वाळू चोरीसारखे गुन्हे करण्यासाठी वापरला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्जदारास वाहन परत केल्यास तो त्यामध्ये बदल, विक्री आणि इतरांना हस्तांतरण करु शकतो. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा.

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.03.12 16:02:21 +0530

४. दोन्ही पक्षांतर्फे स. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

५. अर्जदाराने प्रस्तुत प्रकरणी त्याचे शपथपत्र दाखल करुन कथन केले की, सदरचे वाहन हे तपासकामी जप्त करण्यात आले आहे. अर्जदारातर्फे नि.क्र.३ समवेत कागदपत्रे दाखल करण्यात आली आहेत. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता अर्जदार हा सदयस्थितीत जप्त वाहनाचा मालक व ताबे कब्जेदार असल्याचे दिसुन येते.

६. मी **मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सुंदरभाई अंबालाल देसाई विरुध्द गुजरात शासन ए.आय.आर.२००३ सर्वोच्च न्यायालय पान क्र.६३८** मध्ये दिलेल्या न्यायनिवाडयाचे अवलोकन केले. सदर निवाडयामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे स्पष्ट केले आहे की, जप्त वाहन पोलीस ठाण्यात जास्त काळ न ठेवता त्या संदर्भात लवकरात लवकर योग्य ते आदेश करावेत.

७. वाहन मोकळया हवेत विना वापर ठेवल्यास त्यामध्ये बिघाड होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत जप्त वाहन विना वापर एका जागेवर केसचा निर्णय होईपर्यंत उभे ठेवण्यात काहीच उपयोग नाही. तसेच प्रस्तुत वाहनाची मालकी दाखवणारा दुसरा इसम या प्रकरणात हजर झालेला नाही. त्यामुळे सदरचे वाहन जप्त ठेवुन कोणताही उपयोग होणार नाही. वरील सर्व बाबींचा विचार करता सदर वाहन अटी व शर्तींवर अर्जदाराच्या अंतरिम ताब्यात देणे उचित होईल. करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

| | | |
|---|---|---|
| १. | | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | | अर्जदार याने सदर वाहनाच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल करु नये. |
| ३. | | अर्जदार याने सदर वाहन न्यायालय किंवा तपासी अंमलदार ज्या ज्या वेळी आदेशीत करतील त्या त्या वेळी हजर ठेवावे. |
| ४. | | अर्जदार याने सदर वाहन कोणत्याही प्रकारे विक्री अथवा हस्तातंरीत करु नये. |
| ५. | | तपासी अंमलदार पो.स्टे. गेवराई यांना आदेशीत करण्यात येते की त्यांनी गु.र.नं. ५६/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०३ (१) या गुन्ह्यात |

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.03.12 16:02:27 +0530

| | | |
|---|---|---|
| | | मधील जप्त केलेले जॉन डिअर इंडिया प्रायवेट लिमीटेड (TRAC) कंपनीचे 5045D मॉडेलचे ट्रॅक्टर ज्याचा रजि. नं. MH–21–AN–2213 असा असुन चेसीस क्र. 1PY5045DCGA036206 व इंजिन क्र. PY3029D409494 हे **अर्जदार शाहरुख पि. अजीम सय्यद** यांच्या ताब्यात रक्कम रुपये ५,००,०००/– (रुपये पाच लाख) च्या हमी पत्रावर (Indemnity Bond) खालील अटींवर देण्यात यावे. |
| | **अ.** | तपासी अंमलदार यांनी सदर वाहनाचे पुढून मागून व इतर दोन बाजुंनी फोटो काढावेत. |
| | **ब.** | तपासी अंमलदार यांनी सदर वाहनाच्या सद्य परिस्थिती बाबत सविस्तर पंचनामा करावा. |
| | **क.** | हमीपत्र, फोटो व त्याचे निगेटीव्ह तसेच पंचनामा न्यायालयात त्वरीत दाखल करावा. |

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.03.12 16:02:33 +0530

**गेवराई.**
**दि. १२/०३/२०२६**

**(श्रुती ह. पाटील)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, गेवराई**
**कोर्ट क्र.२.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | :- | 12.03.2026 |
| Transcribed on | :- | 12.03.2026 |
| Checked & Signed on | :- | 12.03.2026 |

Sd/-
(P.B. Kusumkar)
Stenographer (G-3)